सहसंचालक,
उच्च शिक्षण ,मुंबई विभाग , मुंबई
एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई -४०० ००१
वेब साईट - www.jdhemumbai.gov.in ई मेल - jdhemumbai@gmail.com दूरध्वनी व फॅक्स क्र ०२२-२२६५६६००

क्र सहसं/मुवि/२०२२/2648

दिनांक :- 23/5/2022

प्रति,

प्राचार्य / प्राचार्या

सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य,विज्ञान,विधी व अध्यापक महाविदयालय

मुंबई शहर व मुंबई उपनगर.

विषय : अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील दिनांक ०१.१०.२०१७ अखेरचा शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आढावा.

संदर्भ : १. शासन पत्र क्र. आढावा-१५१३/प्र.क्र.१२५/मशि.५, दि. ४/५/२०२२

२.संचालनालयाचे पत्र क्र.पदभ/११२१/प्र.क्र.१०/मवि-१/५४६५ दि. २०/५/२०२२.

उपरोक्त संदर्भाधिन शासन व संचालनालयाच्या पत्रांचे अवलोकन करावे, त्या अनुषंगाने कळविण्यात येते की उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.आढावा-१५१३/प्र.क्र.१२५ (भाग-८)/मशी-५, दि. १२.११.२०२१ अन्वये शिक्षकीय पदांच्या पदभरतीस मान्यता देण्यात आलेली आहे.

केंद्र सरकारच्या आरक्षण धोरणाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ७/२/२०२२ च्या अधिनियमान्वये आरक्षण धोरणांमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानूसार उच्च शिक्षण विभागाने दि. ७/४/२०२२ रोजी अधिसूचना प्रसिध्द केली आहे. तसेच दि. ११/४/२०२२ च्या शासन निर्णयानूसार आरक्षण धोरणांचा अवलंब करणेबाबत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आलेली आहेत.

उपरोक्त संदर्भाधिन शासन व संचालनालयाच्या पत्रानूसार बिंदूनामावली संबंधित प्राधिकरणाकडून निश्चित करून दि. १५/६/२०२२ पर्यत निश्चितपणे नाहरकत प्रमाणपत्र मागणीसाठी प्रस्ताव विहित प्रणालीव्दारे सादर करण्याबाबत सूचीत करण्यात आले आहे.

तरी शिक्षक भरती बाबतची प्रक्रीया ऑनलाईन प्रणालीव्दारे विहीत कालमर्यादीत कालावधीमध्ये पूर्ण करावयाची आहे याची नोंद शिक्षकीय पदांच्या भरतीस मान्यता देण्यात आलेल्या महाविद्यालयांनी घ्यावयाची आहे.

सहसंचालक
उच्च शिक्षण, मुंबई विभाग. मुंबई.

प्रत - माहितीस्तव सादर

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२.

२. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे. ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९

क्र.पदभ/११२१/प्र.क्र.१०/मवि-१ | 5465 दिनांक- २० मे,२०२२

2 0 MAY 2022

अत्यंत महत्वाचे (पदभरती)

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक
(उच्च शिक्षण)

विषय- अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दिनांक- ०१.१०.२०१७ अखेरचा शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आढावा.

संदर्भ- १.शासन पत्र क्र. आढावा-१५१३/प्र.क्र.१२५/मशि.५, दि. ०४ मे, २०२२
२.संचालनालयाचे समक्रमांक दि.०५ मे,२०२२

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकनी घ्यावी.

शासन निर्णय क्र. आढावा-१५१३/प्र.क्र.१२५(भाग-८) म.शि.५, दि.१२ नोव्हेंबर, २०२१ अन्वये एकूण २०८८ शिक्षकीय पदांच्या पदभरतीस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानंतर केंद्र शासनाच्या आरक्षण धोरणाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाचा दि.२५.०१.२०२२ च्या अधिनियमान्वये आरक्षण धोरणामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार उच्च शिक्षण विभागाकडून दि.०७.०४.२०२२ रोजी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच दि. ११.०४.२०२२ च्या शासन निर्णयानुसार आरक्षण धोरणाचा अवलंब कसा करावा याबाबतचे मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करण्यात आलेली आहेत.

याबाबत मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांनी दि. ०४.०५.२०२२ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत. दि. १५.०५.२०२२ पर्यंत सर्व महाविद्यालयांनी संबंधीत प्राधिकरणांकडून बिंदुनामावली निश्चित करून घेण्यात यावी व नाहरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा अशा सूचना मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांनी दिलेल्या आहेत. याबाबत निर्देशित करण्यात येते की, बिंदूनामावली संबंधित प्राधिकरणाकडून निश्चित करुन **दि.१५ जून,२०२२** पर्यंत निश्चितपणे ना हरकत प्रमाणपत्र मागणीसाठी प्रस्ताव विहित प्रणालीव्दारे सादर करण्यात यावे. यासाठी आवश्यकता भासल्यास आपल्या स्तरावरुन आवश्यक निर्देश देण्यात यावेत.

उपरोक्त सूचना आपल्या स्तरावरून सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना तात्काळ कळविण्यात याव्यात. विषयांकीत प्रकरणी उपरोक्त सूचनांप्रमाणे विहीत कालमर्यादेत कार्यवाही पूर्ण होईल याची सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण ) यांनी दक्षता घ्यावी.

(डॉ.प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**प्रत- माहितीस्तव सादर**

मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२